**महाराष्ट्र शासन, कृषि विभाग**

**विभागीय कृषि सहसंचालक, कोंकण विभाग,ठाणे**

**पत्ता - रोड नंबर १६, झेढ लेन, वागळे इस्टेट, ठाणे (प) - ४०० ६०४.**

**फोन नं. ०२२-२५८२३४७९/२५८२०४०७ फॅक्स नं. ०२२-२५८२०२४७**

**ई-मेल -** jdathaneest@gmail.com


**विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे कार्यालयांतर्गत गट - क संवर्गातील कृषि सहाय्यकांची रिक्त पदे कृषि सेवक म्हणून निश्चित वेतनावर सरळ सेवेने भरावयाच्या पदाची जाहिरात सन २०१८-२०१९.**

**जाहिरात क्रमांक : आस्था/कृषि ०१/०२/जाहिरात/सन २०१८-१९/ ४५ दि. ०३/०१/२०१९.**

शासन निर्णय क्र.कृषिआ/२५०५/प्र.क्र.५८७/१६-अे, दिनांक-०९ फेब्रुवारी, २००७, सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ,दि.१९ ऑक्टोबर,२००७, सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.प्रानिम-२००७/ प्र.क्र.४६/ ०७/१३-अ,दि.२७ जून,२००८, शासन निर्णय क्र.साप्रवि, प्रानिमं-१२१४/प्रक्र.(४३/१४)१३-अ, दि.५ जून,२०१४, वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्रक्र.४१/अर्थ-१,दि.२ जून,२०१५, शासन निर्णय क्र.कृषिआ-१२१५/प्रक्र-२५८/१६-ए, दि.१५ डिसेंबर,२०१५, शासन पत्र क्रमांक कृषिआ-१०१७/प्र.क्र.५५/१६-अे,दि.०८ सप्टेंबर,२०१७, शासन निर्णय वित्त विभाग क्र./संकिर्ण-२०१८/प्रक्र-२०/आ.पु.कक्ष.दिनांक १६/५/२०१८, शासन शुध्दीपत्रक, क्र.संकिर्ण-२०१८/प्रक्र-२०/आ.पु.कक्ष. दि.७/१२/२०१८, महाराष्ट्र शासन राजपत्र कृषि व पदुम विभाग दिनांक २९/१/२०१८ व दि.३०/६/२०१८, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्रक्र-५८१-अे/२०१८/१६-ब.दिनांक ५/१२/२०१८, शासन शुध्दीपत्रक क्रं.बीसीसी-२०१८/प्र.क्र.५८१-अे/२०१८/१६-ब दिनांक १९/१२/२०१८, सा.प्र.वि.शासन शुध्दीपत्रक क्र.१११८/प्र.क्र.३९/१६-अ दि.१९/१२/२०१८ मधील तरतुदी व भरतीसंदर्भात वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णय, परिपत्रके व आदेशातील तरतुदीनुसार विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे विभाग ठाणे कार्यालयांतर्गत खाली दर्शविलेप्रमाणे **कृषि सहाय्यक गट - क** संवर्गाच्या रिक्त पदांवर **कृषि सेवक** म्हणून निश्चित वेतनावर सरळसेवेने निवड प्रक्रियेद्वारे भरावयाच्या पदांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेले उमेदवार अर्ज करु शकतील. तसेच महाराष्ट्र शासन सा.प्र.वि.शा. निर्णय क्र.मकसी-१००७/ प्र.क्र.३६/ का.३६, दि.१० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या ८६५ गावातील रहिवासी असलेले उमेदवार अर्ज करु शकतील.

www.nmk.co.in

<u>**पदाचे नाव : कृषि सेवक**</u>

**१. विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे विभाग, ठाणे अंतर्गत सरळसेवा भरतीसाठी उपलब्ध पदसंख्या :**

**१.१) अनुसुचित क्षेत्राबाहेरील पदसंख्या :- ११०**

| पदनाम | समांतर आरक्षणा नुसार भरावयाची पदे | एकूण पदे | मागास वर्गियासाठी राखीव पदांची संख्या | | | | | | | | | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | सा. व शै. दृष्टया मागास प्रवर्ग | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| **कृषि सेवक** | **एकूण पदे** | **११०** | **२** | **२८** | **१** | **०** | **०** | **६** | **०** | **२५** | **१८** | **३०** |
| | महिला | ३३ | १ | ८ | ० | ० | ० | २ | ० | ८ | ५ | ९ |
| | माजी सैनिक | १७ | ० | ४ | ० | ० | ० | १ | ० | ४ | ३ | ५ |
| | प्रकल्पग्रस्त | ५ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| | भुकंपग्रस्त | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | खेळाडू | ५ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| | अंशकालीन | १२ | ० | ३ | ० | ० | ० | १ | ० | ३ | २ | ३ |
| | अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | सर्वसाधारण | ३५ | १ | १० | १ | ० | ० | २ | ० | ७ | ६ | ८ |

**टिप : वरील दर्शविलेल्या पद संख्येमध्ये दिव्यांगांसाठी आरक्षित असलेल्या पदांचा समावेश खालीलप्रमाणे आहे.**

| अल्पदृष्टी | कर्णबधीर | अस्थिव्यंग | एकूण |
|---|---|---|---|
| **१** | **१** | **१** | **३** |

**१.२) अनुसुचित क्षेत्रातील (पेसा) स्थानिक अनुसुचित जमाती या प्रवर्गाकरीता पदसंख्या : १४**

| जिल्हा | अनुसूचित जमाती प्रवर्गांत भरावयाची पदे | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | खेळाडू | अंश कालीन | अनाथ | सर्व साधारण | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **ठाणे** | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ५ |
| **पालघर** | ९ | ३ | १ | ० | ० | ० | १ | ० | ४ | ९ |
| **एकूण** | **१४** | **५** | **२** | **०** | **०** | **०** | **२** | **०** | **५** | **१४** |

**२. सूचना :**

**२.१)** जाहिरातीत नमूद केलेल्या पद संख्येत व प्रवर्गनिहाय आरक्षणाच्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्या प्रवर्गासाठी जाहिरातीमध्ये पद विज्ञापीत केलेले नसेल तरीसुध्दा त्या प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज करावेत. जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पद संख्या कमी असल्यामुळे परिक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही. तसेच

www.rmk.co.in

स्पर्धात्मक परीक्षा स्थगीत करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदाच्या एकुण व संवर्ग निहाय पदसंख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी तथा त्यांचे नियंत्रण अधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

कृषि पर्यवेक्षकांची मर्यादीत विभागीय परीक्षेद्वारे भरावयाच्या पदांमुळे कृषि सहाय्यक संवर्गातील रिक्त होणाऱ्या पदांचा तसेच कृषि पर्यवेक्षक पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना वरीष्ठ पदावर पदोन्नती दिल्यानंतर रिक्त होणाऱ्या पदांवर कृषि सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांना संभाव्या पदोन्नती दिल्यामुळे रिक्त होणाऱ्या पदांचा समावेश विज्ञापित करण्यात येत असलेल्या जाहिरातीमध्ये करण्यात आलेला असून, यामध्ये बदल अपेक्षित आहे. संभाव्य पदसंख्येत बदल झाल्यास गुणवत्ता यादीत समावेश झालेल्या उमेदवाराला नियुक्ती बाबत दावा करता येणार नाही. तसेच दिनांक ३१/१२/२०१९ पर्यंत रिक्त होणारी संभाव्य पदे विचारात घेतलेली असल्यामुळे, निवडीस पात्र ठरलेल्या व ज्या प्रमाणात प्रवर्गनिहाय रिक्त पदे उपलब्ध होतील, त्याप्रमाणेच नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात येईल.

**२.२)** अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावर शिफारशी करीता विचार होत असल्याने, सर्व प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचुकपणे नमुद करणे बंधनकारक आहे.

**२.३)** समांतर आरक्षणांतर्गत महिला, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन व अनाथ यांचे साठी आरक्षित असलेली पदे त्या त्या प्रवर्गातील भरावयाच्या एकूण पद संख्येपैकी आहेत. उर्वरित पदे त्या त्या प्रवर्गातील समांतर आरक्षणा व्यतिरिक्त आहेत. तसेच समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०१२/प्रक्र.१६/१२/१६अ,दि.१३ ऑगस्ट,२०१४ आणि सा.प्र.वि.शासन शुध्दीपत्रक क्र.१११८/प्र.क्र.३९/१६-अ दि.१९/१२/२०१८ तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. **सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.**

www.nmk.co.in

**२.४)** शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.अपंग-१००७/प्र.क्र.६१/सुधार-३,दि.२० एप्रिल,२००७, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३(भाग-३)/१६-अ,दि.१९ ऑक्टोबर,२००७ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.अपंग-१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ,दि.१९ मार्च,२०१० अन्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने निवड करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांगाचे गुणवत्ताक्रमानुसार प्रथम त्याची निवड करण्यात येईल व निवड केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल, त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यात येईल.

**२.५)** ज्या उमेदवारांनी सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण/प्रकल्प अधिकारी,आदिवासी विकास विभाग/जिल्हा सैनिक बोर्ड इ.कार्यालयामध्ये नावे नोंदविलेली आहेत, त्याच प्रमाणे ज्या उमेदवारांची सदर पदांसाठी सेवायोजन कार्यालयाकडून शिफारस करण्यात आलेली आहे, अशा उमेदवारांनीही या पदासाठीच्या लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच परीक्षेसाठीचे विहित शुल्क भरणे आवश्यक राहिल.

२.६) उपरोक्त विज्ञापित पदाकरीता निश्चित वेतन,आवश्यक शैक्षणिक अर्हता, अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील.

| पदाचे नाव | किमान शैक्षणिक अर्हता, वेतन श्रेणी |
|---|---|
| कृषि सेवक | १. **वेतन :** निश्चित वेतन रुपये ६०००/- प्रतिमाह<br>२. **किमान शैक्षणिक अर्हता :** शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील **कृषि पदविका** किंवा **कृषि पदवी** व तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता धारण केलेली आहे असे उमेदवार (शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षात अभ्यासक्रम पुर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहणार नाहीत.)<br>३. निवड झालेल्या उमेदवारांची कृषि सेवक पदी प्रथमत: १ वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे आढळुन आल्यास पुन्हा १ वर्षाची नियुक्ती करण्यात येईल. याप्रमाणे कृषि सेवक पदी नियुक्तीचा कामाचा कालावधी ३ वर्षाचा राहील. ३ वर्षाचा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर पदांच्या उपलब्धतेप्रमाणे व आवश्यकते प्रमाणे उमेदवारास कृषि सहाय्यक या नियमित पदावर नियुक्ती देण्याचा विचार करण्यात येईल. |

**२.७ अनुसुचित क्षेत्रातील स्थानिक अनुसुचित जमातीतील उमेदवारांमधून भरावयाच्या पदांबाबत सूचना :**

२.७.१ उपरोक्त ***परिच्छेद क्र.१.२*** मध्ये नमुद केलेली कृषि सेवक संवर्गातील रिक्त पदे ही अनुसुचित क्षेत्रातील आहेत. शासन अधिसुचना दि.०९ जून, २०१४ मधिल तरतुदीनुसार ही पदे अनुसुचित क्षेत्रातील स्थानिक अनुसुचित जमातीच्या उमेदवारांमधूनच भरावयाची असल्याने स्थानिक क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील अनुसुचित जमातीच्या उमेदवारांना सदर पदाकरीता अर्ज करता येणार नाही. अधिसुचनेत नमुद केल्यानुसार स्थानिक अनुसुचित जमातीचा उमेदवार हा स्वत: किंवा त्याचे आई - वडील किंवा त्याचे आजी-आजोबा संबंधित जिल्हयाच्या अनुसुचित क्षेत्रामध्ये दि.२६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत असल्याचा सबळ पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

२.७.२ अनुसुचित क्षेत्रातील उमेदवाराकडून अनुसुचित क्षेत्रातील स्थानिक (मुळ) रहिवासी असल्याबाबतचा महसुली पुरावा असणे आवश्यक आहे. तसेच सदर उमेदवारांनी अंतीम निवड झाल्यानंतर त्यांना नियुक्ती देण्यापूर्वी त्यांनी अनुसुचित क्षेत्रामधील स्थानिक रहिवासी असल्याबाबत सादर केलेल्या महसूली पुराव्याबाबत पडताळणी केली जाईल, त्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारांना अनुसुचित क्षेत्रात (पेसा) नियुक्ती / नेमणूक दिली जाईल.

**२.७.३** विभागीय कृषि सहसंचालक,कोंकण विभाग, ठाणे कार्यालयांतर्गत अनुसुचित क्षेत्रात येणाऱ्या ठाणे जिल्हयातील मुरबाड, भिवंडी, व शहापूर आणि पालघर जिल्हयातील डहाणू, तलासरी, पालघर, वसई, मोखाडा, जव्हार, वाडा व विक्रमगड तालुक्यातील अनुसुचित जमातीतील स्थानिक उमेदवारच अनुसुचित क्षेत्रातील रिक्त पदांसाठी अर्ज करु शकतील.

**३) वयोमर्यादा :**

**३.१)** जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय **दि. ०१/०१/२०१९** रोजी गणले जाईल.

**३.२)** सर्वसाधारण उमेदवाराकरिता किमान वय १९ वर्ष व कमाल वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच मागास प्रवर्गातील उमेदवारांना विहीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षानी शिथिलक्षम असेल.

**३.३)** दिव्यांग, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन कर्मचारी, सन १९९१ चे जणगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी या उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहील.

www.nmk.co.in

**३.४)** सा.प्र.वि.शासन शुद्धीपत्रक क्रमांक मासैक १०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/०८/२०१० नुसार माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच विकलांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

**४) महिला समांतर आरक्षण :**

**४.१** महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८०/२००१/मसेआ/ २०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५ मे,२००१, व त्यानंतर वेळोवळी निर्गमीत झालेल्या शासन निर्णया नुसार राहील तसेच शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१७/ प्रक.-१९१/१७/कार्या-२ दिनांक १५/१२/२०१७ नुसार अमागासवर्गीय (खुल्या) प्रवर्गातील महीला समांतर आरक्षणसाठी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र पडताळणी आवश्यक राहील. अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकाला महिलेची वैवाहिक स्थिती विचारात घेवून तिचे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**४.२** खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील (क्रिमिलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय रहाणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

**५) भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त समांतर आरक्षण :**

भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.विकाक-२२१५/ प्र.क्र.३३७/१६-अ,दि.०४ नोव्हेंबर,२०१६ मधील तरतूदीनुसार भुकंपग्रस्तांसाठी राखीव असलेल्या २ % पदांवर नियुक्तीसाठी ज्या कुटुंबातील व्यक्तींचे भुकंपात निधन झाले आहे किंवा ज्यांचे घर पूर्णपणे कोसळले होते, त्यामुळे शासनाने त्यांना नवीन घर बांधून दिले अशा व्यक्तींचे पाल्य नियुक्तीसाठी पात्र ठरतील. अशाप्रकारे भूकंपग्रस्तांचे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाही, तर ती पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्यात येतील.

**६) खेळाडू समांतर आरक्षण :**

**६.१** अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंचे आरक्षण शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२,दि.०१ जुलै,२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक्र दिनांक १८ ऑगष्ट २०१६ व शासन शुध्दीपत्र क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१० ऑक्टोबर,२०१७ आणि शासन शुध्दीपत्रक क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२,दि.१५ नोव्हेंबर,२०१७ व शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२,दि.१६ नोव्हेंबर,२०१७ आणि यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**६.२ क्रीडा विषयक अर्हता :**

**६.२.१)** खेळाडू समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

**६.२.२)** राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर संबंधीत खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.

www.nmk.co.in

६.२.३) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेमधील (अश्वमेध) वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा प्रकारामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय किंवा सुवर्ण, रौप्य व कास्य पदक प्राप्त खेळाडू.

६.२.४) भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय किंवा सुवर्ण, रौप्य व कास्य पदक प्राप्त खेळाडू.

६.२.५) भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धातील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय स्थानप्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य व कास्य पदक प्राप्त खेळाडू, तथापि प्रत्येक गटात नियुक्तीसाठी स्पर्धा असेल तर वरिष्ठ प्राविण्यास प्राधान्य देण्यात येईल.

६.२.६) भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजीत केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय किंवा सुवर्ण, रौप्य व कास्य पदक प्राप्त खेळाडू.

६.२.७) आदिवासी विकास विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त करणारे खेळाडू.

६.२.८) संबंधित पॅरा- ऑलम्पिक खेळ संघटनेने आयोजित केलेल्या पॅरा- ऑलम्पिक क्रीडा स्पर्धातील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय स्थानप्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य व कास्य पदक प्राप्त खेळाडू.

६.२.९) अपंग कल्याण विभागामार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त करणारे खेळाडू.

६.२.१०) परिक्षेच्या अंतीम दिनांका पर्यंतचे अथवा त्यापुर्वीच्या दिनांकाचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले व पडताळणी केलेले क्रीडा स्पर्धेचे प्रमाणपत्र सादर करावे.

**६.३)** उपरोक्त ६.२.१ ते ६.२.९ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कब्बडी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळच ५ % खेळाडू समांतर आरक्षणासाठी पात्र असतील.

www.nmk.co.in

**७) अंशकालीन समांतर आरक्षण** :

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७ ऑक्टोबर,२००९ अनुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना गट क मधील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यामध्ये १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यानुसार अंशकालीन उमेदवारांनी सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व सेवा योजन कार्यालयामध्ये या अनुभवाची नोंद घेतल्याबाबत सेवा योजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**८) दिव्यांग :**

दिव्यांग या प्रवर्गातील उमेदवाराचे दिव्यांगतेचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असून शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग आप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दिनांक १४/०९/२०१८ मधील आदेशानुसार विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. शासन निर्णया नुसार कृ.षी. आ 1204/प्र. क्र 387(1)/16(ए) दिनांक २४ जानेवारी २०११ नुसार फक्त अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, कर्णबधीर व किमान ४० टक्के कायमस्वरुपी दिव्यांगत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील व पात्र दिव्यांग उमेदवार लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास, परिक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार पुर्वपरवानगीने लेखनिकाची मदत घेणेबाबत व पुर्व परवानगीने अनुग्रह कालावधी (Compensatory Time) मिळणेबाबतची तरतुद आहे. ज्या दिव्यांग उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना लेखनिक आवश्यक असल्याचा विकल्प दिलेला आहे त्यांनी लेखनिकाची व्यवस्था स्वत: करावयाची आहे व फक्त त्यांनाच परिक्षेच्यावेळी लेखनिक स्वत: सोबत

घेऊन येता येईल. ऑनलाईन अर्ज करतेवेळी लेखनिक हवा असल्याचा उल्लेख केलेला नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही. लेखनिकासाठी घोषणापत्राचा नमूना विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, ठाणे येथे उपलब्ध असून तसेच उमेदवारांना त्यांच्या प्रवेशपत्रासोबत डाऊनलोड करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येत आहे सदरच्या घोषणापत्राचा नमूना उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर विभागीय कृषि सहसंचालक यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह परिक्षेच्यावेळी स्वत: सोबत घेऊन येणे व सादर करणे आवश्यक राहील.

**९) परीक्षा शुल्क :**

९.१) सर्वसाधारण (खुला प्रवर्गातील) उमेदवारांकरीता रु.४००/- व मागासवर्गीयांसाठी रुपये २००/- परीक्षा शुल्क राहील.

९.२) दिव्यांग व्यक्ती व माजी सैनिक यांना परिक्षा शुल्क भरण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

**१०) ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यपद्धती व सूचना खालीलप्रमाणे आहेत. उमेदवाराने सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात आणि त्यानंतरच अर्ज भरावा.**

| **अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सूचना :** | |
|---|---|
| १) | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या सूचना या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि ई-मेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित ई-मेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइन-अपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या ई-मेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे.(Activation लिंक ही २ दिवसांकरिता activate असेल.) उमेदवाराने त्याची/तिची लॉग इनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल<br>टीप :अ) USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल .<br>ब) उमेदवारांने नोंदणी प्रक्रीयेसाठी स्वत:चाच वैध/प्रमाणित ई-मेल आयडी वापरावा. अन्य व्यक्तींचा ई-मेल आयडी वापरु नये. |
| २) | उमेदवाराचे नाव, वडिलांचे, पतीचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी, पत्रव्यवहाराचा पत्ता ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| ३) | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करावे. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे.<br>(टिप : उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .) |
| ४) | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, पत्रव्यवहाराचा पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इत्यादी माहिती भरावी. |
| ५) | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा. उमेदवार जर ST प्रवर्गात मोडत असेल तर त्यास तो ST-PESA प्रवर्गा मध्ये अर्ज करू इच्छितो का नाही तसेच PESAजिल्हा, तालुकायाची माहिती उमेदवारास द्यावी लागेल. जर आपण ST-PESA प्रवर्गातुन अर्ज करत असाल तर आपण फक्त आपल्या ST-PESA |

www.nmk.co.in

| | |
|---|---|
| | जिल्हासाठी अर्ज करू शकता.<br>उमेदवारास कृषि विभागासाठी असलेल्या ८ विभागांपैकी एका विभागाची निवड करावी लागेल, ST-PESA साठी त्याने निवडलेल्या जिल्ह्यानुसार त्याचा विभाग निवडला जाईल. उमेदवार हा एका वेळी फक्त एका विभागासाठी अर्ज करू शकतो. जर एका उमेदवाराने एका पेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल. |
| ६) | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी समांतर आरक्षण (लागू असल्यास ) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल . |
| ७) | मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास ) या संबंधीची माहिती द्यावी लागेल . |
| ८) | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| ९) | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदारास **पुढे** या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील **संपादित** करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| १०) | आता उमेदवारास पदाची (कृषीसेवक)निवड करावी लागेल . त्यानंतर त्यास **प्रोसीड** या बटनावर क्लिक करावे लागेल. |
| ११) | त्यानंतर उमेदवारास कृषिसेवक पदांसाठी आवश्यक असलेली पात्रते बद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |
| १२) | उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणेआवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायां पैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल. |
| १३) | उमेदवाराने सगळ्या नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे.त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (इंटरनेटबँकिंग, क्रेडिटकार्ड /डेबिटकार्ड , भीम UPI )आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. |
| १४) | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री १२.०० वाजता संकेतस्थळा वरील लिंक बंद केली जाईल. |
| १५) | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉग-इन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे परीक्षा प्रवेशपत्र, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही दुबार (डुप्लीकेट) नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी |

www.nmk.co.in

| | |
|---|---|
| | enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८००३०००७७६६ वर कॉल करा.<br>**<u>नोंद</u>** : नोंदणीमधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई-मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), पसंतीचे स्थान, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (Photograph) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन :** | |
| **१)** | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉग-इन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| **२)** | अर्ज प्रिंट करण्यासाठी “प्रिंट प्रिव्ह्यू” या पर्यायावर क्लिक करा.<br>**<u>नोंद</u> :** उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेशपत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वतः जवळ जतन करुन ठेवणे अनिवार्य राहील. |

**महत्त्वाच्या सूचना :**

१. उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थिती मध्ये बदलण्यात येणार नाही.

२. परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थिती मध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

३. उमेदवार वेगवेगळे विभाग/ वेगवेगळ्या पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग /पदे यांकरिता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी. अन्यथा वेगवेगळ्या पदांसाठी च्या परीक्षेसाठी वेगवेगळे परीक्षा केंद्र /शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंती क्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.

५. उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एका पेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.

६. उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.

७. उमेदवारांना दिव्यांग आणि इतर आरक्षणांचा पर्याय पण दिलेला आहे. मदतनीसाची निकड असल्यास उमेदवार तत्संबंधी पण अर्ज करू शकतो.

८. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी आहे किंवा सीमाप्रांतातील ८६५ वादग्रस्त गावांतील रहिवासी आहे हे आधी घोषित करावे लागेल.

९. शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. पदवी कोणत्या विद्यापीठातून घेतली, मिळालेले गुण, कमाल गुण, उत्तीर्ण झालेले वर्ष, विद्यापीठाचे नाव इ. माहिती सुद्धा भरण्यात यावी. त्यानुसार टक्केवारी काढली जाईल.

१०. त्यानंतरचा अर्ज प्रत्येक विभागानुसार आवश्यक त्या माहितीनुसार भरून घेतला जाईल. उमेदवाराला त्यानुसार माहिती द्यावी लागेल.

११.पुढे जाण्यासाठी अर्जदाराला **<u>परीक्षा दाखवा</u>** ऑप्शन वर क्लिक करावे लागेल.

www.nmk.co.in

१२. **नोंदणी व अर्ज भरण्यासाठीचा कालावधी :**

पात्र उमेदवारांना www.mahapariksha.gov.in या वेबसाईटव्दारे **दि. ०५/०१/२०१९ ते दि.२५/०१/२०१९** या कालावधीमध्ये वेब बेस्ड (Web-Based) ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

**११) उमेदवाराची गुणवत्तेनुसार नियुक्तीसाठी निवड झाल्यानंतर संबंधीत नियुक्ती अधिकारी यांचेकडे सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशील :**

११.१) शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याबाबतचे संबंधीत शासनमान्य संस्था/ विद्यापीठाचे प्रमाणपत्राची प्रत.

११.२) जन्मतारखे बाबतच्या पुराव्या दाखल्याच्या प्रमाणपत्राची प्रत.

११.३) सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व असल्यास जात वैधताप्रमाणपत्र.

११.४) महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याबाबतच्या सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

११.५) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्राची प्रत.

११.६) लागू असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या अद्यावत नियमानुसार नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची प्रत.

११.७) दिव्यांग व्यक्तींचे बाबतीत उपरोक्त अ.क्र. ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्राची प्रत.

११.८) परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत व आवेदन पत्राची प्रत.

११.९) माजी सैनिक उमेदवाराने सशस्त्र दलात केलेल्या सेवेबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत.

११.१०) अंशकालीन उमेदवारांनी सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयामध्ये या अनुभवाची नोंद घेतल्याबाबत सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

११.११) खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरीता सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्रत.

११.१२) इतर अनुषंगीक आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रती.

११.१३) अनाथ असल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राची प्रत.

११.१४) खालील दिलेल्या नमुन्यातील लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र.

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना-अ (नियम -४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी.................................................................................................
श्री...................................................यांचा मुलगा / यांची मुलगी /यांची पत्नी वय .......... .वर्ष, राहणार.................................................................................यांद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी ..........................या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ................................(संख्या) इतकी हयात मुले आहे. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .............आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा )

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-..................

दिनांक :-..................

उमेदवाराची सही

(उमेदवाराचे नाव.............................................................)

www.nmk.co.in

११.१५) जाहिरातीतील मुद्दा क्र.२.७.१ व २.७.२ मध्ये नमुद केल्यानुसार सबळ महसुली पुरावा.

**१२) निवडीची पध्दत-**

| **पदाचे नाव** | **तपशिल** |
|---|---|
| **कृषि सेवक** | १. कृषि सेवक पदासाठी फक्त मराठी माध्यमातुन संगणक प्रणलीव्दारे (ऑनलाईन) परीक्षा घेण्यात येईल.<br>२. **संगणक आधारीत परीक्षेव्दारे** (Computer Based online examination) घेण्यात येणाऱ्या परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल.<br>३. **संगणक आधारीत** (Computer Based examination) घेण्यात येणारी परीक्षा २०० प्रश्नांची व २०० गुणांची घेण्यात येईल. त्यासाठी दोन तासाचा कालावधी राहील.<br>४. **संगणक आधारीत परीक्षा** (Computer Based online examination) मराठी - २० प्रश्न, इंग्रजी - २० प्रश्न, सामान्य ज्ञान - २० प्रश्न, बौद्धीक चाचणी- २० प्रश्न व कृषि विषयक - १२० प्रश्न अशा एकूण २०० प्रश्नांची राहील. प्रत्येक प्रश्नास एक गुण राहील. परीक्षा राज्यातील जिल्हयाच्या मुख्यालयी घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.<br>५. मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौद्धीक चाचणी परीक्षेचा दर्जा एस.एस.सी. (इयत्ता १० वी) अभ्यासक्रमावर आधारीत राहील व कृषि विषयाच्या परीक्षेचा दर्जा कृषि पदविका दर्जाचा राहील.<br>६. प्रश्नांची काठीण्य पातळी ५० : ३० : २० अशी अनुक्रमे सोपे, मध्यम व कठीण याप्रमाणे राहील. |

**१२.१) उपरोक्त पदासाठी घेण्यात येणारी संगणक आधारीत परीक्षा** (Computer Based online examination) **स्लॉट मध्ये घेण्यात येईल. त्याचा तपशिल उमेदवारांना प्रवेशपत्रा बरोबर देण्यात येईल.**

१२.२) पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र व परिक्षेविषयी आवश्यक सुचना ऑनलाईन व एसएमएसद्वारे कळविण्यात येईल व www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावीत. संगणकीय परिक्षेनंतर सर्वसाधारण गुणवत्ता यादी www.mahapariksha.gov.in व कृषि विभागाच्या **www.krishi.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारास स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२.३) शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१२-अ, दि.२७/०६/२००८ नुसार जे उमेदवार लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील अशाच उमेदवारांचा निवडीसाठी विचार करण्यात येईल.

१२.४) संगणकीय परिक्षेमध्ये उमेदवारास समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२७ जून, २००८, दि.०५ ऑक्टोबर,२०१५ व शासन पूरकपत्र दि.०२ डिसेंबर,२०१७ मधील तरतुदीनुसार निवड प्रक्रियेची कार्यवाही करण्यात येईल.

१२.५) गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी ऑनलाईन आवेदनपत्रात सादर केलेल्या माहितीनुसार मुळ कागदपत्रांची पडताळणी विभागीय कृषि सहसंचालक, ठाणेकार्यालयाकडुन करुनच नियुक्ती देण्यात येईल. पडताळणीत चुकीची, अपूर्ण अथवा खोटी माहिती आढळून आल्यास त्या टप्प्यावर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१२.६) संगणकीय परिक्षेसाठी उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२.७) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशासन-२०००/प्र.क्र.५/२००१/३२, दि.२० जुलै, २००२ व अनुषंगीक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली अ किंवा ब येथे नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

www.nmk.co.in

अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल. मात्र शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन) विभाग क्र. मातंस-२०१२/प्रक्र.२७७/३९, दि. ०४/०२/२०१३ मधील परिच्छेद १ ते ५ मध्ये नमूद केलेल्या संगणक/ माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

ब) महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MSC-IT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

**१३) इतर अटी व शर्ती -**

१३.१) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१३.२) उमेदवारास ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या आवेदन पत्रातील माहितीच्या आधारे **संगणक आधारीत परीक्षेस** (Computer Based online examination) बसण्यास तात्पुरती परवानगी देण्यात येईल व निवड झाल्यानंतर प्रमाणपत्र **पडताळणीच्या** वेळेस ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या अर्जातील माहिती अपुर्ण अथवा चुकीची / खोटी आढळून आल्यास उमेदवाराची निवड त्या टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१३.३) मागासवर्गीयांसाठी असलेले आरक्षण हे केवळ महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्यांसाठी लागू राहिल व सक्षम अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे आवश्यक राहील. तसेच वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास सादर करणे आवश्यक राहील.

१३.४) अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त विजा-अ, भज-ब, भज-क, भज- ड, सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गातील तसेच इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग व खुला महिला यांना उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू करण्यात आले असल्याने, त्याबाबतचे प्रमाणपत्र (या जाहीरातीमधील अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापासून उमेदवाराचे मागील तीन आर्थिक वर्षाचे सरासरी उत्पन्न गृहीत धरुन निर्गमीत केलेले नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र) सादर केल्याशिवाय नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही. विवाहीत महिलांच्या बाबतीत अर्ज करण्याच्या दिनांकाची वैवाहिक स्थिती विचारात घेऊन त्यानुसार त्यांचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र स्विकारण्यात येईल.

१३.५) माजी सैनिक या आरक्षित पदासाठी उमेदवार स्वत: माजी सैनिक असावा.

१३.६) समांतर आरक्षणांतर्गत असलेले महिला, खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त व अंशकालीन कर्मचारी व अनाथ या प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

१३.७) उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपूर्ण अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची सबंधित पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना / नोटीस अथवा कारण न देता उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

**१३.८) संगणकीय** (Computer Based online examination) **परीक्षा केवळ मराठी माध्यमातून घेतली जाईल.**

१३.९) नियुक्तीस पात्र ठरलेल्या मागासप्रवर्गातील उमेदवारांना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.१२ डिसेंबर,२०११ मधील तरतूदीनुसार नियुक्तीपासून ६ महिन्याच्या आत जात वैधताप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परिक्षा, संगणक अर्हता उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील.

१३.१०) नियमित नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारास नवीन परीभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल.

www.nmk.co.in

१३.११) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये उमेदवारांनी दिनांक २८/३/२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत **मुद्दा क्र.११.१४** मध्ये नमूद केल्यानुसार प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहिल. अर्जदार यांना हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च,२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी उमेदवार निवडीस / नियुक्तीस अपात्र राहील.

१३.१२) अ) शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्रक्र.६६/२०११/ई-१०, दि.२७ जून,२०११ नुसार ज्या उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास, त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

ब) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची अट लागू असणार नाही.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारासाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

१४) निवड प्रक्रियेच्या संदर्भात सर्व अधिकार संबंधित निवड समिती / नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

१५) निवड प्रक्रियेच्या संदर्भात समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**१६) ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचा अंतिम दि.२५/०१/२०१९ असून त्या दिनांकास रात्री २३.५९ वाजता ऑनलाईन अर्ज स्विकृती बंद करण्यात येईल.**

१७) सदरची जाहिरात राज्य शासनाच्या महापरिक्षा कक्षाच्या www.mahapariksha.gov.in व कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**स्थळ - ठाणे**
**दिनांक - ०३/०१/२०१९**

**विभागीय कृषि सह संचालक**
**कोकण विभाग, ठाणे**

www.nmk.co.in